# <u>संजीवन मधून जवानांसाठी राख्या पाठविण्यात आल्या</u>.



सिमेवरील जवानांसाठी संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभाग पन्हाळा यांचे वतीने संकलित केलेल्या राख्या थेट सीमेवर पाठविण्यासाठी कसबा बावडा येथील आझाद हिंद राष्ट्रीय चारीटेबल ट्रस्ट कडे मा. प्राचार्य डॉ. जी. व्ही. मुळगुंद सर यांच्या मार्फत सुपूर्त करण्यात आल्या.

संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातून विद्यार्थ्यांनी या राख्या संकलित करून सीमेचे रक्षण करणाऱ्या वीर जवान बांधवांशी बंधुत्वाचे नाते दृढ केले.

या कामी चेअरमन मा. पी. आर. भोसले सर, सह-सचिव मा. एन.आर.भोसले सर, प्राचार्य डॉ. जी. व्ही. मुळगुंद सर, विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख मा. पी. पी. कुलकर्णी व आझाद हिंद राष्ट्रीय चारीटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष मा. राहुल मगदूम आणि मा. आर.डी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.